सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सूचना (पुरवणी) कार्यक्रम पत्रिका क्रमांक ०३/२०१२-१३

महापालिका सभा दिनांक १२/०६/२०१२ करीता.

मंगळवार दि.१२/०६/२०१२ रोजी दुपारी ०३.०० वाजता पद्मभूषण डॉ.वसंतदादा पाटील सभागृह, मुख्यालय, सांगली येथे होणाऱ्या महापालिका सभेपुढे ठेवण्यासाठी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण २ "महापालिका सभेचे कामकाज" खंड १(ज) अन्वये खाली नमूद केलेल्या प्रस्तावाच्या सूचना मा.सदस्य यांचेकडून प्राप्त झाल्या आहेत.

१. मा.श्री.मकरंद सुधाकर देशपांडे, यांनी दिलेला प्रस्ताव :-

४३

महानगरपालिका क्षेत्रातील मिरज शहरातील शिवनेरी चौक ते भारतभूषण शाळेपर्यंतच्या रस्त्यास "कै.गोपाळ अनंत साठये" असे नामकरण करण्यात यावे ते मिरज शहरातील जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते व माजी नगरसेवकही होते. त्यांचे सामाजिक व राजकीय क्षेत्रात फार मोलाचे योगदान आहे. त्यांच्या कार्याचा गौरव म्हणून शिवनेरी चौक ते भारतभूषण शाळे पर्यंतच्या रस्त्यास "कै. गोपाळ अनंत साठये" असे नामकरण करणेस मान्यता मिळणेकामी आलेला प्रस्ताव.

२. मा.सौ.संगिता विठ्ठलराव खोत, यांनी दिलेला प्रस्ताव :-

४४

महानगरपालिका हद्दीमध्ये बेथलेहहमनगर परिसरात आठवडा बाजार भरविणे बाबत महिला वर्गात तसेच, आसपासच्या कॉलनी मधून वारंवार मागणी होत आहे. यासंबंधी नागरिकांची निवेदनेही प्राप्त झालेली आहेत. सदर ठिकाणी आठवडा बाजार हा विजयनगर, समतानगर येथे भरत आहे. बेथलेहमनगर भागासाठी या आठवडा बाजाराचा काही उपयोग होत नाही. त्याच बरोबर विनोबा भावे कॉलनी, मिरजवाडी, सांगली मिरज रोड हिरोहोंडा शोरुम पिछाडीचा सर्व भाग, टिळक कॉलनी, सुरज कॉलनी हा विस्तारीत भाग येत असल्याने व मोठ्या प्रमाणात विकसीत होत असल्याने सदर ठिकाणी नागरिकांची गैरसोय होत आहे. त्यामुळे बेथलेहमनगर गल्ली नं.३ या ठिकाणी आठवडयाच्या प्रत्येक रविवारी आठवडा बाजार भरविल्यास वाहतुकीस अडथळा न होता या सर्व भागांना त्याचा फायदा होऊन नागरिकांची गैरसोय दुर होणार आहे. तरी, बेथलेहमनगर गल्ली नं.३ या ठिकाणी आठवडयाच्या प्रत्येक रविवारी बाजार भरविणेस मान्यता मिळणेकामी आलेला प्रस्ताव.

३. मा.श्री. आनंदा मारुती देवमाने, यांनी दिलेला प्रस्ताव :-

४५

महानगरपालिका कार्यक्षेत्रातील गुंठेवारी भागातील नागरिकांना पाणी कनेक्शन देण्यासाठी यापूर्वी महासभेने गुंठेवारी नियमितीकरणाचा प्रस्ताव सादर करण्याच्या अटीवर रु.१०० मात्रच्या स्टॅम्प पेपरवर हमीपत्र घेऊन गुंठेवारीमध्ये पाणी कनेक्शन देण्याचे धोरण अवलंबले होते. परंतू गुंठेवारी नियमितीकरणाची मुदत दि.३०/११/२०११ रोजी संपल्याने गुंठेवारीमध्ये पाणी कनेक्शन देणे प्रशासनाने बंद केले होते.

गुंठेवारी भागातील नागरिकांचे कडून सदरची योजना पुर्ववत सुरु करणेची वारंवार मागणी होत आहे. तसेच, दि.१९/०५/२०१२ रोजीच्या महासभेमध्ये गुंठेवारी नियमितीकरण्यासाठी ३० सप्टेंबर, २०१२ पर्यंत मुदतवाढ दिलेली आहे. त्यामुळे गुंठेवारी भागातील नागरिकांना रु.१०० मात्रचे स्टॅम्प पेपरवर हमीपत्र घेऊन पाणी कनेक्शन देणेची योजना पूर्ववत सुरु करण्यास मान्यता मिळणेकामी आलेला प्रस्ताव.

४. मा.श्री.प्रमोद प्रकाशराव सूर्यवंशी यांनी दिलेला प्रस्ताव :-

४६

महानगरपालिकेचे इको सिटी वाटचालीचे धोरण असून, त्यानुसार शहरातील खुले भूखंड वृक्ष लागवड व संवर्धनासाठी अग्रक्रमाने वापरणेचे धोरण आहे. शहरातील पर्यावरणाचे O२ चे प्रमाण वाढविणेसाठी हे अत्यंत आवश्यक व गरजेचे आहे.

त्यातील भाग म्हणून सांगलीवाडी येथील गट क्र.३९/३ हा ८२ आर चा भूखंड सांगलीवाडी येथील डॉ.पतंगराव कदम महाविद्यालय सांगलीवाडीस नियमांच्या अधिन राहून करार स्वरुपात बॉटनिकल गार्डन व अन्य स्वरुपातील औषधी वनस्पती, ग्रीन हाऊस इ. विकसित करणेस तयार असून, सदरचा भूखंड विकसित करणेसाठी डॉ.पतंगराव कदम महाविद्यालयास नियमानुसार करारपध्दतीने चर्चा करुन देणेबाबत निर्णयासाठी आलेला प्रस्ताव.

५. मा.श्री.हणमंतराव बंडूजी पवार, यांनी दिलेला प्रस्ताव :-

सांगली मिरज आणि कुपवाड महापालिका आस्थापनेवरील कायम कर्मचाऱ्यांना गेली कित्येक वर्षे पदोन्नती देणेत आलेली नसून कालबध्द पदोन्नती लाभ प्रथम व लाभ द्वितीय देणेत आलेला नाही. गेली बरेच वर्षे सदर कर्मचारी पदोन्नतीसाठी पाठ पुरावा करीत असून, कित्येकवेळा महासभा/स्थायी समिती मध्ये याबर जोरदार चर्चा ही झालेली आहे. काही वेळा पदोन्नती झाले शिवाय सभा चालू न देणेचा प्रकार ही घडला आहे. परंतू प्रशासन मात्र सोयीस्कर दुर्लक्ष करत आहे. सध्या महापालिकेमध्ये मोठ्या प्रमाणात जागा रिक्त असून, एकेका अधिकाऱ्याकडे/कर्मचाऱ्याकडे एका पेक्षा अनेक चार्ज असल्याने, कामे होणे दुरापास्त व कठिण झालेले आहे. महापालिकेतील कामकाजाची/ जबाबदारी सध्या प्रभारी अधिकाऱ्याकडे /कर्मचाऱ्याकडे असलेने कारभारही प्रभारीच सुरु आहे. दि.१८/०४/२०१२ व दि.२१/०४/२०१२ रोजी पदोन्नती समितीच्या बैठका संपन्न होऊन त्यामध्ये ३२ संवर्गातील एकूण १७२ इतक्या पदासाठी शासन नियमाप्रमाणे १:३ याप्रमाणात उमेदवाराची निवडयादी सर्व प्रक्रिया पूर्ण करुन समितीच्या सदस्यांच्या स्वाक्षरीसह आयुक्तांच्या स्वाक्षरीसाठी ठेवणेत आलेले आहेत. तसेच, ९१ कर्मचाऱ्यांना प्रथम लाभ देणेसाठी व २६२ कर्मचाऱ्यांना द्वितीय लाभ देणेसाठी शिफारस करणेत आलेली आहे. त्यावर ही अंतीम मान्यता देणेत आली नाही. वरील सर्व बाबींचा विचार करता जे पदोन्नतीसाठी व कालबध्द पदोन्नतीसाठी पात्र कर्मचारी आहेत. त्यांना विनाविलंब तातडीने पदोन्नती देऊन न्याय देणेत यावा व सदर कर्मचाऱ्यांवर होत असलेल्या अन्याया विरुध्द त्यांना न्याय मिळावा तसेच, पदोन्नती व कालबध्द पदोन्नती यादीतील बरेच कर्मचारी लवकरच सेवानिवृत्त होणार असलेने, सदर पदोन्नतीचा त्यांचे सेवाकाळात लाभ मिळावा यासाठी विचार करुन निर्णय होणेकामी आलेला प्रस्ताव.

महापालिका सचिव कार्यालय,
महापालिका मुख्यालय, सांगली.
दिनांक : ०८/०६/२०१२.

महापालिका सचिव,
सांगली,मिरज आणि कुपवाड शहर
महानगरपालिका.

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०३ दिनांक :- १२/०६/२०१२

ठराव क्रमांक :- ५३

विषय क्रमांक :- १(ज)

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य श्री.मकरंद सुधाकर देशपांडे यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिका क्षेत्रातील मिरज शहरातील शिवनेरी चौक ते भारतभूषण शाळेपर्यंतच्या रस्त्यास "कै.गोपाळ अनंत साठ्ये" असे नामकरण करण्यात यावे अशी तेथील नागरीकांची मागणी आहे. कै.गोपाळ अनंत साठ्ये हे मिरज शहरातील जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते व माजी नगरसेवकही होते. त्यांचे सामाजिक व राजकीय क्षेत्रात फार मोलाचे योगदान आहे. त्यांच्या कार्याचा गौरव म्हणून शिवनेरी चौक ते भारतभूषण शाळे पर्यंतच्या रस्त्यास "कै.गोपाळ अनंत साठ्ये" असे नामकरण करणेस महासभेने निश्चित केले धोरणानुसार इरादा प्रसिद्ध करुन सूचना व हरकती मागविणेस ही सभा मान्यता देत आहे.

उक्त प्रस्तावाचे अनुषंगाने मा.शितल जिनगोंडा पाटील यांनी दिलेली उपसूचना दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिकेच्या चिंतामणी नगर परिसरामध्ये महापालिका व म्हाडा यांच्या संयुक्त विद्यमानाने शासनाकडून लोकआवास योजनेंतर्गत १२० घरकुले बांधण्यात आली आहेत त्यास लागूनच अंदाजे १५० झोपडपट्टी वजा घरे आहेत. या भागाला सरकारी दप्तरी व महापालिकेमध्ये चिंतामणी नगर झोपडपट्टी असा उल्लेख आहे. या भागामध्ये जागरुक देवस्थान श्री.खंडोबाचे मंदिर आहे. तसेच बहुसंख्य नागरीक हे खंडोबाचे भक्त आहेत. या भागाला चिंतामणी नगर झोपडपट्टी ऐवजी श्री.खंडोबा मंदिर परिसर असे नामकरण करणेस त्या परिसरातील नागरीकांची मागणी आहे. त्यानुसार चिंतामणीनगर झोपडपट्टीस यापुढे श्री.खंडोबा मंदिर परिसर असे नामकरण करणेस महासभेने निश्चित केले धोरणानुसार इरादा प्रसिद्ध करुन सूचना व हरकती मागविणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :-

अनुमोदक :-

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०३ दिनांक :- १२/०६/२०१२

ठराव क्रमांक :- ५४

विषय क्रमांक :- १(ज)

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्या सौ.संगिता विठ्ठल खोत यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिका हद्दीमध्ये बेथलेहहमनगर परिसरात आठवडा बाजार भरविणे बाबत महिला वर्गात तसेच, आसपासच्या कॉलनी मधून वारंवार मागणी होत आहे. यासंबंधी नागरिकांची निवेदनेही प्राप्त झालेली आहेत. सदर ठिकाणी आठवडा बाजार हा विजयनगर, समतानगर येथे भरत आहे. बेथलेहमनगर भागासाठी या आठवडा बाजाराचा काही उपयोग होत नाही. त्याच बरोबर विनोबा भावे कॉलनी, मिरजवाडी, सांगली मिरज रोड हिरोहोंडा शोरुम पिछाडीचा सर्व भाग, टिळक कॉलनी, सुरज कॉलनी हा विस्तारीत भाग येत असल्याने व मोठ्या प्रमाणात विकसीत होत असल्याने सदर ठिकाणी नागरिकांची गैरसोय होत आहे. त्यामुळे बेथलेहमनगर गल्ली नं.३ या ठिकाणी आठवड्याच्या प्रत्येक रविवारी आठवडा बाजार भरविल्यास वाहतुकीस अडथळा न होता या सर्व भागांना त्याचा फायदा होऊन नागरिकांची गैरसोय दुर होणार आहे. तरी, बेथलेहमनगर गल्ली नं.३ या ठिकाणी आठवड्याच्या प्रत्येक रविवारी बाजार भरविणेस ही सभा मान्यता देत असून, या बाबतची पुढील कार्यवाही प्रशासनाने ठेवावी असे ही सभा आदेशित करीत आहे.

सूचक :- Kerron

अनुमोदक :-

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

आरोग्य व्यवस्थापक

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०३ दिनांक :- १२/०६/२०१२

ठराव क्रमांक :- ५५

विषय क्रमांक :- १(ज)

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य श्री.आनंदा मारुती देवमाने यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिका कार्यक्षेत्रातील गुंठेवारी भागातील नागरिकांना पाणी कनेक्शन देण्यासाठी यापूर्वी महासभेने गुंठेवारी नियमितीकरणाचा प्रस्ताव सादर करण्याच्या अटीवर रु.१०० मात्रच्या स्टॅम्प पेपरवर हमीपत्र घेऊन गुंठेवारीमध्ये पाणी कनेक्शन देण्याचे धोरण अवलंबले होते. परंतू गुंठेवारी नियमितीकरणाची मुदत दि.३०/११/२०११ रोजी संपल्याने गुंठेवारीमध्ये पाणी कनेक्शन देणे प्रशासनाने बंद केले होते.

गुंठेवारी भागातील नागरिकांचे कडून सदरची योजना पुर्ववत सुरु करणेची वारंवार मागणी होत आहे. तसेच, दि.१९/०५/२०१२ रोजीच्या महासभेमध्ये गुंठेवारी नियमितीकरण्यासाठी ३० सप्टेंबर, २०१२ पर्यंत मुदतवाढ दिलेली आहे. त्यामुळे गुंठेवारी भागातील नागरिकांना रु.१०० मात्रचे स्टॅम्प पेपरवर हमीपत्र घेऊन पाणी कनेक्शन देणेची योजना पूर्ववत सुरु करण्यास ही सभा मान्यता देत मान्यता देत असून, या बाबतची पुढील कार्यवाही प्रशासनाने ठेवावी असे ही सभा आदेशित करीत आहे.

सूचक :-

अनुमोदक :-

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

कार्य अभियंता (पा.पु.)
सदरचा ठराव मा. आयुक्तसो यांचे निर्देशनास आणून कार्यवाही ठेवावी.

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०३ दिनांक :- १२/०६/२०१२

ठराव क्रमांक :- ५६

विषय क्रमांक :- १(ज)

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य श्री.प्रमोद प्रकाशराव सुर्यवंशी यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिकेचे इको सिटी वाटचालीचे धोरण असून, त्यानुसार शहरातील खुले भूखंडावर वृक्ष लागवड व संवर्धनासाठी अग्रक्रमाने वापरणेचे धोरण आहे. शहरातील पर्यावरणातील O२ चे प्रमाण वाढविणेसाठी हे अत्यंत आवश्यक व गरजेचे आहे. यातील एक भाग म्हणून सांगलीवाडी येथील गट क्र.३९/३ हा ८२ आर चा भूखंड सांगलीवाडी येथील डॉ.पतंगराव कदम महाविद्यालय सांगलीवाडीस महापालिका अधिनियमांच्या अधिन राहून रितसर करार करुन बॉटनिकल गार्डन व अन्य स्वरुपातील औषधी वनस्पती,ग्रीन हाऊस इ. महापालिकेच्या संयुक्त विद्यमाने असे फलक लावणेच्या अटीवर विकसित करणेसाठी नियमानुसार व महापालिकेच्या शर्ती-अटीनुसार करारपध्दतीने देणेस ही सभा आदेशित करीत आहे.

सूचक :- Kerwon

अनुमोदक :-

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

मालमत्ता व्यवस्थापक

सदस्य ठराव मा. आयुक्तसो यांचे निर्देशनास आणुन कार्यवाही ठेवावी.

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०३ दिनांक :- १२/०६/२०१२

ठराव क्रमांक :- ५६

विषय क्रमांक :- १(ज)

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य श्री.हणमंत बंडूजी पवार यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

सांगली मिरज आणि कुपवाड महापालिका आस्थापनेवरील कायम कर्मचाऱ्यांना गेली कित्येक वर्षे पदोन्नती देणेत आलेली नसून कालबध्द पदोन्नती लाभ प्रथम व लाभ द्वितीय देणेत आलेला नाही. गेली बरेच वर्षे सदर कर्मचारी पदोन्नतीसाठी पाठ पूरावा करीत असून, कित्येकवेळा महासभा/स्थायी समिती मध्ये यावर जोरदार चर्चा ही झालेली आहे. काही वेळा पदोन्नती झाले शिवाय सभा चालू न देणेचा प्रकार ही घडला आहे. परंतू प्रशासन मात्र सोयीस्कर दुर्लक्ष करत आहे असे या सभेचे मत आहे. सध्या महापालिकेमध्ये मोठ्या प्रमाणात जागा रिक्त असून, एकेका अधिकाऱ्याकडे/कर्मचाऱ्याकडे एका पेक्षा अनेक चार्ज असल्याने, नागरीकांची कामे होणे कठिण झालेले आहे. महापालिकेतील कामकाजाची/ जबाबदारी सध्या प्रभारी अधिकाऱ्याकडे /कर्मचाऱ्याकडे असलेने कारभारही प्रभारीच सुरु आहे. दि.१८/०४/२०१२ व दि.२१/०४/२०१२ रोजी पदोन्नती समितीच्या बैठका संपन्न होऊन त्यामध्ये ३२ संवर्गातील एकूण १७२ इतक्या पदासाठी शासन नियमाप्रमाणे १:३ याप्रमाणात उमेदवाराची निवड यादी सर्व प्रक्रिया पूर्ण करुन समितीच्या सदस्यांच्या स्वाक्षरीसह आयुक्तांच्या स्वाक्षरीसाठी ठेवणेत आलेले आहेत. तसेच, ९१ कर्मचाऱ्यांना प्रथम लाभ देणेसाठी व २६२ कर्मचाऱ्यांना द्वितीय लाभ देणेसाठी शिफारस करणेत आलेली आहे. वरील सर्व बाबींचा विचार करता जे पदोन्नतीसाठी व कालबध्द पदोन्नतीसाठी पात्र कर्मचारी आहेत. त्यांना विनाविलंब तातडीने पदोन्नती देण्यात यावी असे ही सभा सूचित करीत असून, पदोन्नती व कालबध्द पदोन्नती यादीतील बरेच कर्मचारी लवकरच सेवानिवृत्त होणार असलेने, सदर पदोन्नतीचा त्यांचे सेवाकाळात त्यांना लाभ मिळावा यासाठी प्रशासनाने कागदपत्रांची पुर्तता केलेल्या १४९ पात्र कर्मचाऱ्यांना पहिल्या टप्प्यात तातडीने आठ दिवसात पदोन्नतीचे आदेश पारित करावे असे ही सभा आदेशित करीत आहे.

सूचक :- हणमंत पवार

ठराव सर्वानुमते मंजुर

प्रशा. अधिकारी (आस्था)

अनुमोदक :-

महापौर,

सदस्य ठराव मा. आयुक्तांचे यांचे निर्देशनास अंतर्गत कार्यवाही ठेवावी.

महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका